वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# मुख्यमंत्री होते तेव्हा काही चालू दिलं नाही आता उपमुख्यमंत्र्याचे केव्हा चालू द्यायचे

## 'अशा वेळेला ते एकनाथ शिंदेच पाहिजे होते', मनोज जरांगेंचं मुख्यमंत्रिपदाबद्दल मोठं विधान



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com
दिव्य वार्ता

### 'मुख्यमंत्री संतोष देशमुखांचा दुसऱ्यांदा बळी घेताहेत' -मनोज जरांगें

केज, (दिव्य न्युज):- सरकार आपल्यासोबत असून आपल्याला न्याय नाही म्हटल्यावर... सोबत नसतं तर ठीक आहे की, आंदोलन करावं लागेल. पण, यापेक्षा कोणते संवेदनशील प्रकरण हवंय सरकारला? अशा वेळेला ते शिंदे साहेबच पाहिजे होते, असे मोठे विधान मनोज जरांगे पाटील यांनी मंगळवारी मस्साजोग येथे केले. मस्साजोग येथे सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाला मनोज जरांगे पाटील यांनी भेट दिली. संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपासाबद्दल जरांगेंनी असमाधान व्यक्त केले. त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही त्यांनी निशाणा साधला.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगेंनी माध्यमांशी बोलताना भूमिका मांडली. अशा टायमाला ते शिंदे

▸▸ पान २ वर

## बीड जिल्ह्यात दहशत निर्माण करणाऱ्या ४ गुंडांना पोलीस अधीक्षकांनी केले हद्दपार

बीड, (दिव्य न्युज):- जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करत बीडचे पोलिस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी चार कुख्यात गुंडांना दोन वर्षांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्याचा निर्णय घेतला आहे.

बीड जिल्ह्यात चोरी, जबरी चोरी, घरफोडी, खून, खुनाचा प्रयत्न, दरोडे तसेच मारहाण करून दहशत निर्माण करणाऱ्या टोळ्यांवर पोलिस अधीक्षक काँवत यांनी करडी नजर ठेवली आहे. अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ५५ अंतर्गत कठोर कारवाई करत त्यांना हद्दपार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अजय अशोक तांदळे (वय २३, रा. कोरेगाव, ता. केज), विकास सुभाष सावंत (वय २८, रा. सावंतवाडी, ता. केज), सोमनाथ राजाभाऊ चाळक (वय २२, रा. लव्हरी, ता. केज) आणि बालाजी राम लांब (वय १९, रा. कोरेगाव, ता. केज) अशी या गुंडांची नावे आहेत.

सदर गुन्हेगारांवर शरीरविरुद्ध व मालविरुद्ध गंभीर गुन्हे, जिवे मारण्याचा प्रयत्न, दहशत निर्माण करणे, अवैध शस्त्रे बाळगणे, जबरी चोरी, लोकांना मारहाण करणे अशा अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.पोस्टे प्रभारी अधिकारी प्रशांत महाजन यांनी तयार केलेला हद्दपार प्रस्ताव पोलिस अधीक्षक कार्यालयास सादर केला होता. याची सखोल चौकशी उपविभागीय पोलिस अधिकारी केज यांनी केली. त्यानंतर दिनांक १० आणि २० फेब्रुवारी २०२५ रोजी आरोपींना संधी देऊन, त्यांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचा अभ्यास करून हद्दपारीचा निर्णय घेण्यात आला.

चारही गुन्हेगारांना बीड, लातूर व धाराशिव जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले आहे.

▸▸ पान २ वर

## मिरचीच्या आडून अफूच्या झाडांची लागवड

### पावणेदोन लाखांचे अफू जप्त; शेतमालकावर गुन्हा


केज , (दिव्य न्युज):- तालुक्यातील कळंबअंबा गावात पोलीस व महसूल विभागाने संयुक्त कारवाई करत एका शेतातून मिरचीच्या रोपाच्या आडून केलेली अफूच्या झाडांची बेकायदेशीर लागवड उघडकीस आणली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उत्तम रंगनाथ मस्के (वय ७०, रा. कळंबअंबा, ता. केज) याच्यावर एन.डी.पी.एस. कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस हवालदार सय्यद यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार उत्तम मस्के याने त्याच्या शेतात मिरचीच्या आडून अफूची झाडे लावल्याची माहिती मिळाली. यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाने पोलीस व महसूल विभागाने संयुक्त कारवाई केली.

पान २ वर































पान १ वरून

## मुख्यमंत्री होते तेव्हा

साहेबच पाहिजे होते. त्यांनी खपाखप तुरुंगात टाकले असते. तंगड्या धरून आपटले असते. ही काय तिरस्कारासारखी वागणूक आहे. देशमुख कुटुंबाला उपोषणाला बसावं लागतंय म्हणजे तिरस्काराची वागणूक आहे.मुख्यमंत्र्यांना देशमुख कुटुंबीयांनी आणि गावकऱ्यांनी प्रतिसाद दिला की नाही? आजही देताहेत. तुम्हाला एकदाही माया दया फुटत नाही. सरकारसोबत असून न्याय नाहीये, असे मनोज जरांगे म्हणाले.

एकनाथ शिंदे सरकारमध्ये आहेत, जरांगेंनी काय दिले उत्तर?

तुम्ही म्हणालात एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असते, तर तुरुंगात टाकलं असतं. पण, ते सरकारमध्ये आहेत? असा प्रश्न मनोज जरांगे यांना विचारण्यात आला.

या प्रश्नाला उत्तर देताना मनोज जरांगे म्हणाले, अरे बाबा, मुख्यमंत्री होते, तेव्हाच चालू दिलं नाही, आता उपमुख्यमंत्र्याचं केव्हा चालू द्यायचं. तेव्हा कामं झाली नाहीत. आमच्या दोन मागण्यांना आता दोन महिने होतील. मराठा आरक्षणाच्या. आठ मागण्या होत्या. म्हणाले, चार करतो. चारपैकी आता दोन वर आलेत. त्याही पूर्ण होईना. कुणाचाच कुणाला मेळ नाही. यातून लक्षात येतं की, गरिबांचा सरकारला किती तिरस्कार आहे, असे उत्तर मनोज जरांगेंनी दिले.

एकनाथ शिंदे भेटीला आले नाहीत?

देशमुख कुटुंबीयांच्या भेटीला एकनाथ शिंदे आले नाहीत, असा प्रश्नही जरांगेंना विचारण्यात आला. ते म्हणाले, ते आले. नाही आले. तो त्यांचा विषय आहे. ते मला माहिती नाही. बाकीचे कुणीच येऊन गेले नाहीत, त्यांचं काय? फडणवीस पण आले नाहीत. देशमुख कुटुंबीयांनी काय हेलिकॉप्टर लावायचं होतं का? इकडे काय मुसळधार पाऊस होता, इकडचे सगळे पूल वाहून गेले होते? मी बरोबरी करत नाही, मी फरक सांगतोय. फडणवीसांचा द्वेष किंवा शिंदे लय चांगले, असं नाही. आम्ही दोघांच्या कामातील फरक सांगतोय, असे मनोज जरांगे म्हणाले.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाला तीन महिने लोटले आहेत. आतापर्यंत एकाही आरोपीला पोलिसांनी पकडले नाही, जे ९ जण अटक आहेत, ते स्वतःहून हजर झालेले आहेत. आतापर्यंत १५० पेक्षा जास्त नावे सहआरोपी करण्यासाठी दिली गेली, पण काहीच झाले नाही. मुख्यमंत्री दुसऱ्यांदा संतोष देशमुख यांचा बळी घेत आहेत, असे गंभीर आरोप मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारवर केले आहेत.

मस्साजोगमधील अन्नत्याग आंदोलनाच्या ठिकाणी मनोज जरांगेंनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, ही वेळ यायलाच नको होती. पण, आता जी वेळ यायला नको होती, ती आलेली आहे. दुर्दैव आहे. गावाला आज न्याय मागावा लागतोय आणि सत्ताधारी फक्त तपास सुरू आहे इतकंच सांगतात.पहिल्या दिवसापासून आतापर्यंत बघितलं, तर आहे तेच आरोप आहेत. सगळ्या राज्याला दिसत आहे. नावं सांगितली जातात, पुरावे दिले जातात. पण त्यानंतर प्रक्रिया का होत नाही, ते कळत नाही. कुटुंबांवर ही दुर्दैवी वेळ आहे, अशी खंत मनोज जरांगे यांनी व्यक्त केली. सहआरोपी करण्याची मागणी केली गेली आहे. शंभर-दीडशे नावे आहेत. खंडणी, मारहाण आणि भ्रष्टाचारात असणारे. काही पोलीस आहेत. एक माणूस अटक करायला, पुरावा सापडल्यानंतर ती गोष्ट करायला लावण्यासाठी प्रत्येक वेळी आंदोलन करावं लागतं. मग, सरकारने तीन महिन्यात नेमकं काय केलं?, असा सवाल मनोज जरांगे यांनी महायुती सरकारला केला आहे.

पकडण्यात आलेल्या एका तरी आरोपीचं नाव सांगा - जरांगे

ही क्रूर हत्या झालेली आहे. सरकार म्हणतंय की एकालाही सोडलं जाणार नाही. पण, आतापर्यंत धरलंय कोणाला? एखादं नाव तरी आम्हाला सांगा. हे ९ जण तुम्ही धरलेले नाहीत. हे स्वतःहून आलेले आहेत. तुम्ही आरोपी केलेले नाही. जनतेने आंदोलन केल्यामुळे त्यांची अटक झालेली आहे, असा मुद्दा मांडत जरांगेंनी सरकारच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

जरांगेंकडून सुरेश धसांच्या भूमिकेवर शंका

तीन महिन्यात एकही सहआरोपी होत नाही. मग सरकारला या प्रकरणाचं नेमकं काय करायचं आहे? हा शोधाचा विषय झालेला आहे. नाव सांगणारे तुम्ही, पुरावे देणारे तुम्ही, सरकार तुम्ही आणि तुम्ही आतापर्यंत केलं काय? साधं तुम्हाला आतापर्यंत उज्ज्वल निकम देता आले नाहीत. किरकोळ विषय आहे. मागणी करणारे तुम्ही, मस्साजोगच्या गावकऱ्यांना मुख्यमंत्र्यांकडे घेऊन जाणारे तुम्हीच आणि होऊ न देणारे पण तुम्हीच, असा गंभीर आरोप मनोज जरांगे यांनी धस यांच्यावर नाव न घेता केला.

तीन महिन्यांपासून सुरू आहे, पण यात आजपर्यंत झालंय काय? तुम्ही सरकार असून, कुटुंबाला उपोषणाला बसायची वेळ आलीये. प्रत्येक वेळी गोड बोलून तुम्ही देशमुख कुटुंबाला वेठीस धरू शकत नाही. सरकार इथं येत आणि तरीही त्यांना उपोषणाची वेळ आलीये. महायुती असो किंवा महाविकास आघाडी यात देशमुख कुटुंबाचा बळी नका घेऊन आणि मुख्यमंत्री संतोष देशमुखांचा दुसऱ्यांदा बळी घेत आहेत, असे गंभीर विधान मनोज जरांगे यांनी केले.

## बीड जिल्ह्यात दहशत

जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी भविष्यातही चझऊ-, चउजउ- आणि हद्दपारसारख्या कठोर कारवाया केल्या जातील, असे पोलिस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी स्पष्ट केले आहे.

सदर कारवाई अपर पोलिस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलिस अधिकारी कमलेश मिना, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, वैभव पाटील, स्थानिक गुन्हे शाखा निरीक्षक उस्मान शेख, सपोउपनि अभिमन्यू औताडे आणि पोलीस हवालदार गित्ते, बिबिसेन चव्हाण यांनी केली.बीड जिल्ह्यात अशा कठोर कारवाया सुरूच राहणार असून, गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासन सज्ज असल्याचा इशारा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिला आहे.

## मिरचीच्या आडून

पोलीस, महसूल अधिकारी व पंच यांच्या उपस्थितीत मस्के यांच्या शेतात छापा टाकण्यात आला. या कारवाईत एकूण ४ किलो ३२० ग्रॅम वजनाचे अफूच्या झाडे जप्त करण्यात आले. जप्त अफूची अंदाजे किंमत १,७२,८०० रुपये असल्याचे कृषी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.सदर प्रकरणी कलम १८ एन.डी.पी.एस. कायद्यान्वये शेत मालक उत्तम मस्के याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर अधीक्षक चेतना तिडके, सहा. अधीक्षक मीना यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय मच्छिंद्रनाथ शेंडगे, पोउपनि चनशेट्टी, पोलीस कर्मचारी भगवान खेडकर, सीताराम डोंगरे, घोरपडे, महादेव केदार, गणपती राउत, चव्हाण, शिनगारे, आतकरे यांनी महसूल विभागाच्या सहकार्याने पार पाडली. या कारवाईमुळे परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये खळबळ उडाली आहे. पोलीस आणि महसूल विभागाकडून अशा अवैध शेतीवर लक्ष ठेवण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.